# महिला सबलिकरण समिती

डॉ.जावळे प्रतिभा आनंदराव
प्रमुख, महिला सबलिकरण समिती
दिनांक-०६/०१/२०२३

## अहवाल

अनेकान्त एज्युकेशन सोसायटी का तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय व महिला सबलीकरण समिती , कृसा अंतर्गत **दि.3 जानेवारी 2023** रोजी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या **रझिया पटेल** यांचे **'स्त्री सक्षमीकरण'** या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते आपल्या व्याख्यानामध्ये त्यांनी असे सांगितले की जगाच्या अर्थ पातळीवर पोहोचलेल्या महिला या फक्त तीन टक्केच आहेत.ज्या वंचित, दुर्बल महिला आहेत.त्यांचा कार्यकारण भाव समजून घेतला पाहिजे.तसेच स्त्रियांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले पाहिजे.त्या पुढे म्हणाल्या की जोपर्यत तुमच्या मनामध्ये विचार निर्माण होत नाही तोपर्यत सक्षमीकरण होत नाही. स्त्रिया ठामपणे व्यक्त झाल्या पाहिजेत.अशा विविध बाबी त्यांनी मांडल्या.या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रशेखर मुरूमकर यांनी केले प्रास्ताविकामध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना आदरांजली वहात असताना स्वतःला ओळखण्याची क्षमता तयार झाली आहे का? याचा प्रत्येकाने विचार केला पाहिजे.समाज घडविण्यासाठी आपण काय करणार हा प्रश्न देखिल स्वतःला विचारला पाहिजे. असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या व मराठी विभागप्रमुख प्रो.डॉ.सीमा नाईक-गोसावी या होत्या.आपल्या अध्यक्षीय व्यक्तव्यामधून त्यांनी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा घेत आजच्या स्त्री ने देखिल आपल्या संस्कारातून सुसंस्कृत पिढी घडविली पाहिजे. तरच सक्षमीकरण होईल.सामाजिक कार्यकर्त्या मा.रझिया पटेल यांचा परिचय कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा.वैशाली पोळ यांनी करून दिला तसेच कार्यक्रमाचे आभार महिला सबलीकरण समिती प्रमुख डॉ.प्रतिभा जावळे यांनी केले. यावेळी उपप्राचार्या डॉ.योगिनी मुळे कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या प्रा.वैशाली माळी मॅडम कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील महिला सबलीकरण समितीतील सर्व सदस्यांनी या कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. विभागपमुख, प्राध्यापक तसेच **255** विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.स्मिता मंगुडकर यांनी केले. मा.प्राचार्याच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला

Noted
VP, IQAC

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI 413 102 PUNE

डॉ. प्रतिभा जावळे
महिला सबलीकरण समिती



















TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

डॉ. प्रतिभा जावळे

दैनिक सकाळ दि. ०७/०१/२०२३ पान.नं. ८



**बारामती :** रझिया पटेल यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरुमकर.

# टीसी महाविद्यालयात व्याख्यान

**बारामती :** "स्त्रिया जो पर्यंत वंचित आणि दुर्बल राहतील तो पर्यंत विकासाची प्रक्रीया सुरु होऊ शकत नाही," असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्त्या रझिया पटेल यांनी केले. तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयात महिला सबलीकरण समितीतर्फे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पटेल यांचे स्त्री सक्षमीकरण या विषयावर व्याख्यान झाले. त्या प्रसंगी त्या बोलत होत्या. प्राचार्य डॉ. चंद्रशेखर मुरूमकर यांनी प्रास्ताविक व स्वागत केले. पटेल म्हणाल्या, "जगाच्या अर्थपातळीवर पोहोचलेल्या तीन टक्केच महिला आहेत. ज्या वंचित दुर्बल महिला आहेत. त्यांचा कार्यकारण भाव समजून घेतला पाहिजे. स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. स्त्रियांना आग्रहाने निर्णय क्षमतेमध्ये प्राधान्य दिले पाहिजे." उपप्राचार्या डॉ. सीमा नाईक गोसावी अध्यक्षस्थानी होत्या. वैशाली पोळ यांनी परिचय करून दिला, स्मिता मंगुडकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. प्रतिभा जावळे यांनी आभार मानले. संस्थेचे अध्यक्ष जवाहर वाघोलीकर व सचिव मिलिंद वाघोलीकर यांनी मार्गदर्शन केले. सकाळ ७/१/२३ पान ४

Tuljaram Chaturchand College
Library
Baramati